वन विकास करापासून मिळणाऱ्या जमा रक्कमांमधून
वित्त व्यवस्थापन करण्याबाबत (४४०६०१७१)

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : एफएसटी-०३/१८/प्र.क्र.१५४/फ-४
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- २१ मार्च, २०१८

<u>वाचा</u> :- १) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१/ पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.३० /२१८९/१७-१८, दि.२३.०२.२०१८
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१/ पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.१०२ /२२४४/१७-१८, दि.१४.०३.२०१८
३) वित्त विभाग, शासन परिपत्रक, क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.०६.०२.२०१८
४) महसूल व वन विभाग, ज्ञापन क्र. बीयूडी-२०१८/२४०६/प्र.क्र.३१/ब-१, दि.१२ मार्च, २०१८

<u>प्रस्तावना</u> :-

मागणी क्र.सी १० लेखाशिर्षक ४४०६ वनीकरण व वन्यजिवन यावरील भांडवली खर्च वन विकास करातून मिळणाऱ्या जमा रक्कमेतून वित्त व्यवस्था करण्यात आलेल्या योजना (०८) (०१) वन विकास करातून मिळणाऱ्या जमा रक्कमेतून वित्त व्यवस्था करण्यात आलेल्या योजनांमध्ये संदर्भ क्र.४ मध्ये आठमाही सुधारीत अंदाज सन २०१७-१८ भांडवली खर्च या लेखाशिर्षाखाली नमूद केलेल्या मर्यादेत चालू वित्तय वर्षाचा संपूर्ण खर्च करण्यास प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य , नागपूर यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

सदर प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांनी सुधारीत तरतूदीमध्येच आपला खर्च भागवावा. कोणत्याही परिस्थितीत त्यापेक्षा अधिक खर्च होणार नाही याची दक्षता घ्यावी. नाशिक आणि ठाणे वन्यजीव विभागातील मजुर हे जास्तीत जास्त यावल आणि ताणसा अभयारण्याचा संरक्षणाच्या कामासाठी वापरण्यात येत आहे. यावल व ताणसा अभयारण्यामध्ये असलेल्या मजुरांच्या उपस्थितीमुळेच मोठ्या प्रमाणावर होणारे संभाव्य नुकसान कमी झलेले आहे. ही बाब विचारात घेता, वनांचे संरक्षण व जतन करण्यासाठी या मजुरांची अत्यंत आवश्यकता आहे. परंतु येथील मजुरांचे मजुरी देण्यासाठी अन्य स्त्रोत उपलब्ध नसल्याने त्यासाठी लागणारी रक्कम वनवृत्त नाशिक व ठाणे करीता एकूण १८६.३९ लक्ष रक्कमेचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर केला असून अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास),महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्र.१ अन्वये पाठविला आहे. सदर निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचारधीन होती.

शासन निर्णय :-

महसूल व वन विभाग, ज्ञापन दि.१२.०३.२०१८ अन्वये मागणी क्र.सी-१०, ४४०६ वनीकरण व वन्यजीवन (कार्यक्रमांतर्गत) या लेखाशिर्षाखाली प्रस्तावित केलेल्या आठमाही सुधारीत अंदाजपत्रकात नमुद केलेल्या मर्यादेपर्यंत चालु वित्तीय वर्षाचा संपुर्ण खर्च करण्यास मान्यता प्रधान मुख्य वनसंरक्षक महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना प्राधिकृत करण्यात आले आहे तसेच वित्त विभागाच्या दि.०६.०२.२०१८

रोजीच्या परिपत्रकान्वये, सन २०१७-१८ करिता महसूली खर्च शीर्षांतर्गत योजनांकरिता ०२ मजुरीकरीता १०० % व इतर बाबींसाठी ८०% मर्यादेत निधी वितरित करण्याकरिता मान्यता देण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने, संदर्भ क्र.२ येथील दि.१४.०३.२०१८ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता "वन विकास करापासून मिळणाऱ्या जमा रक्कमांमधून वित्त व्यवस्थापन करण्याबाबत (४४०६०१७१) " या लेखाशिर्षाअंतर्गत अर्थसंकल्पीत निधीच्या १०० टक्के मर्यादेत **रु.१८५.६५ लक्ष (०२-मजुरी रु.१८१.९२ व २७ लहान बांधकामे रु.३.७३ लक्ष)** इतका निधी वितरित व खर्च करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

सदर योजनेअंतर्गत उपलब्ध करून दिलेला निधी विभागीय स्तरावर तसेच वनवृत्त स्तरावर एकाच बाबीवर दोनदा खर्च होणार नाही याची संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी. तसेच सदरहू निधी वितरीत करण्यापूर्वी निश्चित केलेल्या अधिकारी / कर्मचारी यांना गणवेश भत्याचे वाटप करताना कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी.

सदर योजनेवरील होणारा खर्च हा सन २०१७-२०१८ करिता प्रधान शिर्ष ४४०६-वनीकरण व वन्यजीवन. १०२ सामाजिक व क्षेत्र वनिकरण. (०८) (०१) वनविकास करापासून मिळणा-या जमा रकमामधून वित्त व्यवस्था करण्यात आलेल्या योजना (४४०६ ०१७१) या लेखाशिर्षाखाली उपलब्ध होणा-या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२११६२०५३९११९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Atul Ashok Kode

Digitally signed by Atul Ashok Kode
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a12403ed93b05957cb29b7e95265d3ac52d366233b80405514f23a879132aeec, serialNumber=f0d5ee4c99cc9cbfa8761b3ddc7bd6650bad33302f33a35400ad5aad2291371a, cn=Atul Ashok Kode
Date: 2018.03.21 17:55:09 +05'30'

(अतुल कोदे)
सह सचिव
महसूल व वन विभाग

प्रति :-

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४) सर्व मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)
५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), १/२ महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
६) सह सचिव / उप सचिव, वित्त विभाग (अर्थ-३) / (व्यय-१०), मंत्रालय, मुंबई-३२.
७) उप सचिव, नियोजन विभाग (१४७५), मंत्रालय, मुंबई-३२.
८) ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
९) निवडनस्ती, फ-४ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.